परवानगी वर्ष :- **२०११-२०१२**
माध्यम : - **इंग्रजी**
**कायम विना अनुदान**

जा.क.शिउस/माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०१२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 12 FEB 2013

1896/10

**प्रति,**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे.

**विषय :- कायम विना अनुदानित तत्वावर नविन इंग्रजी माध्यमिक शाळेस इ. ८ वी चे वर्गास प्रथम मान्यता मिळणेबाबत...**
**पुणे इंटरनॅशनल स्कूल ,विद्यानगर (टिंगरेनगर) रोड नं.१४, पुणे-३२.**

**संदर्भ-** १) शासन निर्णय क्र.नमाशा-२०१०/(९६/२०१०)/माशि-१ दि.१०.०३.२०१०
२) शासन निर्णय क्रमांक नमाशा-२०१०/(९६/१०)/माशि-१ दिनांक १४.१०.२०१०.
३) शासन पत्र क क.इमाशा २०१२/(९/१२)/माशि-१ दिनांक २७.७..२०१२
४) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र. जि. प/माध्य/२६८३ दिनांक १४.१२..२०१२

उपरोक्त विषयासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी विचारात घेऊन पुणे इंटरनॅशनल स्कूल, विद्यानगर, **(टिंगरेनगर)** पुणे या माध्यमिक शाळेस खालील अटींवर आणि तपासणी अहवालातील सर्वच सूचनांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याच्या शर्तीवर **कायम विना अनुदान तत्वावर सन २०११-२०१२** मध्ये **इयत्ता आठवी च्या वर्गास जून-२०११ पासून तात्पुरती प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

१ नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

३. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

४.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

५. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

६. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

७.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून तीन वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

**इतर अटी :-**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येंवू नयेत.

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे

४.सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी.व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

.. २....

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे.वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ :-१) शासन पत्र क्रमांक याचिका-२००९/प्र.क्र.२४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर २००९.

२) संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२००९/६४११६/याचिका/१५ क(८)९३४४ दिनांक २४ सप्टेंबर-२००९.

६. **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेला निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळास इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

**(धनाजी बुटे)**
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-**१.करिता**

स्थळप्रतीवर मा.शिक्षण उपसंचालक यांची सही असे.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
**१. मुख्याध्यापक पुणे इंटरनॅशनल स्कूल ,विद्यानगर (टिंगरेनगर) पुणे-३२.**
**२. विभागीय सचिव, पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.**

प्रत माहितीसाठी सादर,
१.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
२.निवडनस्ती.

**कायम विनाअनुदान**

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.शिक्षण/माध्य/नैवा/2618/१३
पुणे दिनांक १० /७/२०१३

**प्रति,**

**अध्यक्ष/ सचिव/ मुख्याध्यापक,**
**चलवादी एज्युकेशन सोसायटीचे**
**पुणे इंटरनॅशनल स्कूल, विदयानगर**
**पुणे-३२.**

**विषय** - **नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत**
इ.९ वी (सन २०१२-१३) व इ.१० वी (सन २०१३-१४)

**संदर्भ** - १) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.शिउसं/ माध्य-३/१३/प्र.मा./पुवि/२०१३/४१८६/९० दिनांक १२/२/२०१३
२) आपलेकडील प्राप्त प्रस्ताव दिनांक १४/६/२०१३

आपल्या **चलवादी एज्युकेशन सोसायटी पुणे** संचलीत **पुणे इंटरनॅशनल स्कूल, विदयानगर पुणे-३२** या कायम विनाअनुदानित इंग्रजी माध्यमिक शाळेतील इ.८ वीच्या वर्गास जून २०११ पासुन कायम विनाअनुदान तत्वावर उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांनी परवानगी / प्रथम मान्यता दिलेली आहे.

सदर विदयालयात जून २०१२ पासून इ.९ वी व जून २०१३ पासून इ.१० वीचे वर्ग सुरु केलेले असुन सदरच्या दोन्ही वर्गास अनुक्रमे **जून २०१२ व जून २०१३ पासुन नैसर्गिक वाढीने कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे.

( बी.के. दहिफळे )
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

प्रत - मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सादर.

११/७/१३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १